श्री. व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धेत घवघवीत यश

"विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर अभ्यासक्रमपूरक उपक्रमाकडे देखील आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी लक्ष देणे गरजेचे आहे. यामधून एक चांगला नागरिक व उत्तम व्यक्तिमत्त्व बनण्यास मदत होते .म्हणून महाविद्यालयातून सतत अभ्यासपूरक उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना चालना दिली जाते." असे प्रतिपादन डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते बी.बी.ए. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाच्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी राजारामनगर, साखरले, या ठिकाणी घेण्यात आलेल्या "INSPIRA 2K23" या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये इचलकरंजी येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयातील बी.बी.ए. भाग एक व दोन मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील "पोस्टर प्रेझेंटेशन" या स्पर्धेमध्ये बी.बी.ए. भाग दोन मधील भावना जानमने, सृष्टी उळागडडे यांनी प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे नाव उंचावले. त्याचबरोबर "जाहिरात सादरीकरण" या स्पर्धेमध्ये बी.बी.ए. भाग दोन मधील विद्यार्थिनी पायल भोईसोरा, रिया तापडिया, राधिका जोशी, विश्वनाथ नाईक, मंथन नाणेगावकर या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच सानिका पाटील, सृष्टी क्षीरसागर, प्रणाली केरीपाळे, प्रथमेश हुडेदमनी या संघाला द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेसाठी श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य व बी.बी.ए. विभागाच्या समन्वयक प्राध्यापिका पी.पी.दाइंगडे व इतर प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार व कौतुकास्पद अभिनंदन केले. स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, रोख बक्षीस व पदक देण्यात आले व त्यांचा गौरव करण्यात आला. महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी आणखीन एक मानाचा तुरा रोवला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्राचार्यांनी समाधान व्यक्त केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




बी.बी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने व विभाग प्रमुख प्राध्यापिका पी. पी. दाइंगडे व प्राध्यापक वर्ग